जळगाव दि. १० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील कुलगुरु प्रा. व्हि. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा. एस. टी इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनात रसायनशास्त्र प्रशाळेमार्फत रविवार, दि. ०५ एप्रिल २०२६ रोजी कलीना कॅम्पस मुंबई विद्यापीठ, मुंबई येथील राजीव गांधी सभागृहात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. आर. डी. कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रशाळेचे माजी संचालक तथा कबचौउमवि बी.सी.यु.डी.चे माजी संचालक प्रा. डी. जी. हुंडीवाले हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी मंचावर आय.सी.टी.चे मुंबईचे माजी कुलसचिव तथा पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. आर. आर. देशमुख, मुंबई रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक डॉ. नविनचंद्र शिंपी, प्रशाळेचे संचालक प्रा. डी. एस. दलाल, प्रा. डॉ. रत्नमाला बेंद्रे तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा. व्ही. व्ही. गिते हे उपस्थित होते.

वरील कार्यक्रमाला प्रशाळेचे १९९२ पासून ते २०२६ पर्यंतचे ३२० आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. गिते यांनी कार्यक्रमाची रुपरेषा आणि माजी विद्यार्थी मेळाव्याचे महत्व सांगितले तसेच या संदर्भात प्रशाळेची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. प्रशाळेचे संचालक प्रा. दलाल यांनी माजी विद्यार्थ्यांना प्रशाळेच्या सुरुवाती पासून ते आतापर्यंतचा प्रवासाची वाटचाल व सद्य परिस्थितीची माहीती उपस्थितांना दिली. तसेच माजी विद्यार्थ्यांना प्रशाळेतून मिळणारा पाठींबा आणि त्यांच्याकडून अपेक्षा यावर विचार मांडले.

प्रमुख पाहुणे कुलगुरु डॉ. कुलकर्णी सर यांनी विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेत गुरु आणि शिष्य यांचे नाते गुरुकुल परंपरा तसेच तत्कालीन भारतीय नालंदा व तक्षशिला यासारख्या जगविख्यात विद्यापीठानां राजकोषातून कोणतीही आर्थिक मदत केली जात नसतांनाही सदरची विद्यापीठे अतिशय प्रगत होती व याचे सर्व श्रेय माजी विद्यार्थी मेळाव्यांना द्यावे लागेल कारण अशा प्रकारे माजी विद्यार्थी मेळावा भरुनच त्याकाळी विद्यापीठे विद्यार्थ्यांकडून मोठ्याप्रमाणावर निधी निर्माण करत असत असे सांगितले. तसेच नवीन शै. धोरणानुसार OJT (नौकरी प्रशिक्षण) आणि Placement (नौकरीच्या संधी) मध्ये माजी विद्यार्थ्यांचे महत्व विषद करुन कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्रा. हुंडीवाले यांनी प्रशाळा सुरु करण्या संदर्भात आलेल्या अडचणी आणि विषय निवड करण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न याविषयी उजाळा दिला. तसेच केमिकल टेक्नॉलॉजी आणि रसायनशास्व प्रशाळा या दोन्ही विभागांच्या एकत्र एम. एस्सी. कोर्सच्या विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये मिळालेल्या नियुक्त्या व यश याविषयी माहिती दिली. प्रा. देशमुख यांनी माजी विद्यार्थ्यांचा मेळावाचे महत्व व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनावर झालेले सकारात्मक परीणाम याविषयी विविध उदाहरणे देऊन विषद केले. रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. शिंपी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठात उच्च शिक्षणाच्या संधी यावर व्याख्यान दिले.

दुपार सत्रात माजी विद्यार्थी डॉ. ज्ञानेश्वर अहिरे, संचालक UBA या कंपनी धारक विद्यार्थ्यांनी आपल्या कंपनीचे प्रोडक्ट व कंपनी याविषयी थोडक्यात माहीती दिली. तसेच उपस्थित माजी विद्यार्थ्यांपैकी स्टार्टअप कंपनी फाऊंडर डॉ. अशोक चौधरी संचालक, Green Hydroxyl Pvt. Ltd., Mumbai, डॉ. राहुल हेडाऊ, डॉ. अविनाश बागले, डॉ. महेश बोराणे संचालक Green Agrocare and Polymers Pvt. Ltd., Mumbai, डॉ. सतिलाल पाटील Green Vision Life Sciences Pvt. Ltd. Pune, यांनी आपल्या आज पर्यंतचा प्रवासाची माहीती देऊन माजी विद्यार्थ्यांना स्वतःचा Startup सुरु करण्यासाठी लागणाऱ्या सर्व पैलूंवर चर्चासत्रात चर्चा झाली. अजून एका चर्चा सत्रात रसायनशास्त्र व्यतिरीक्त इतरही विषयांमध्ये असलेल्या संधी वर चर्चा झाली या चर्चा सत्रात डॉ. योगेश राजपूत, दिक्षिता, इषिता, रुपाली तोमर व इतर विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केले. तसेच काही मोठ्या कंपनीत काम करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वतःचे अनुभव व आलेल्या कठिण परीस्थितीत केलेल्या प्रगतीची माहीती थोडक्यात सांगितली. काही विद्यार्थ्यांनी आपल्या रसायनशास्त्र प्रशाळेतील आठवणींना उजाळा दिला कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुपाली तोमर, अश्विनी पवार, योगेश राजपूत, डॉ. संदिप राजपूत यांनी केले. डॉ. गिते यांनी उपस्थितांचे आभार मानले. तत्पुर्वी प्रशाळेच्या प्रा.रत्नमाला बेंद्रे हया पुढील महीन्यात नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने सर्व उपस्थितांच्या वतीने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. आर. डी. कुलकर्णी यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. बेंद्रे हया सत्कार स्विकारल्यानंतर विद्यार्थ्यांशी हितगुज करतांना जुन्या आठवणींना उजाळा देत अत्यंत भाऊक झाल्या. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रशाळेचे संचालक प्रा. दिपक दलाल, प्रा. प्रकाश राठोड, डॉ.ए.डी. जंगले, अमृत दाभाडे तसेच प्रशाळेतील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तसेच मुंबई येथील माजी विद्यार्थी कमेटी सदस्य डॉ. योगेश राजपूत, डॉ. संदिप राजपूत, डॉ. महेंद्र नेवरे, डॉ. अक्षय गिरासे, मयुर गिरासे यांनी सुध्दा अथक परीश्रम घेतले.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १० (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे प्रतीवर्षी ११ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधी दरम्यान क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर यावर्षी देखील हा जयंती महोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा होणार आहे. महोत्सव सुरुवातीच्या पूर्व दिवशी भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात क्रांतीबा महात्मा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक अधिष्ठानावर आधारित 'साहित्यसृजन' या भित्तीपत्रीकेचे विमोचन विद्यापीठीय जयंती महोत्सवाचे समन्वयक डॉ. अनिल डोंगरे, सह-समन्वयक राजू सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. म. सु. पगारे, भित्तीपत्रीकेचे संपादक मंडळ, प्राध्यापक वृंद, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

'साहित्यसृजन' या भित्तीपत्रिकेंतर्गत वेगवेगळे औचित्य साधून विविध विषयांवर विद्यार्थीभिमुख पत्रिका तयार करून डकवण्यात येतात. ज्यातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नाविन्यपूर्ण भर पडत असते. यावेळी क्रांतीबा महात्मा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे औचित्य साधत त्यांच्या वैचारिक अधिष्ठानावर आधारित पत्रिका तयार करण्यात आल्या. ज्यामध्ये दोन्ही महापुरुषांच्या आयुष्याची आणि कार्याची माहिती समाविष्ट करण्यात आली होती. यासह भारतीय संविधानाची उद्देशिका, महात्मा फुलेंचे निवडक 'अखंड', नामदेव ढसाळांची 'डॉ. आंबेडकरांना' ही कविता, प्रा. डॉ. म. सु. पगारे यांचे 'भीम विचारांची गाणी' या नुकत्याच लोकार्पित झालेल्या गाण्याचा समावेश करण्यात आला होता.

यावेळी भित्तीपत्रीकेचे विमोचक प्रा. डॉ. अनिल डोंगरे म्हणाले की, जगाच्या इतिहासात अनेक संस्कृतींची सभ्यता उदयास येऊन लयाला गेलेल्या आहेत. सिंधू संस्कृती आणि वैदिक संस्कृतीवर थोडक्यात प्रकाश टाकून या संस्कृती नष्ट होण्याच्या कारणांवर त्यांनी मीमांसा केली आणि संस्कृती संवर्धनासाठी महापुरुषांच्या विचारांची निकड त्यांनी यावेळी अधोरेखित केली. महापुरुषांचे विचार कालातीत असतात. ते प्रत्येक काळातील संस्कृतीच्या उत्कर्ष वर्धनासाठी उपयुक्त असतात, असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. जयंती महोत्सवाचे सह-समन्वयक राजू सोनवणे यांनी यावेळी 'साहित्यसृजन' या भित्तीपत्रिका उपक्रमाचे कौतुक करून अशाच नवनवीन विषयांवर भित्तीपत्रिका तयार करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ करण्याचा प्रयत्न करत रहा, अशा सदिच्छा व्यक्त करत संपादक मंडळाला शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय मनोगतात कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी भगवान गौतम बुद्ध, महात्मा ज्योतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेव आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांना उजाळा दिला. जगात सगळीकडे अस्थिरता आणि माणसाच्या जगण्याशी संबंधित अनेक प्रश्न उभे असताना भीषण युद्धाची परिस्थिती उद्भवलेली आहे. माणूस माणसाच्या जीवावर उठलेला आहे. अशावेळी 'युध्द नको बुद्ध हवा' या उद्घोषाची परिणामकारकता डॉ. पगारे यांनी प्रतिपादित केली. आखाती देशातील नेतृत्वांनी बुद्ध समजून घेतला असता तर निरागस, निरपराध लोकांचा जीव त्यांनी घेतला नसता. महापुरुषांचे विचार समजून घेऊन शांतता, प्रेम, करुणा, माणुसकी या सगुणांना आत्मसात करून व्यक्तीने शीलवान जीवन जगण्याचा प्रयत्न करावा, असा मौलिक संदेश यावेळी त्यांनी

..........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० एप्रिल, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता